कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद
E-Mail id- gadzpaurangabad@gmail.com
दुरध्वनी क्र. ०२४०-२३२९७१४, Fax No. ०२४०-२३३५५७३
संकेत स्थळ - www.aurangabadzp.gov.in

जा.क्र.जिपऔ/साप्रवि/३-प्रशासन/२०२२/६९५/२७६९ दिनांक: १३.०९.२०२२ १५

# जाहिरात

कोरोना परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद,औरंगाबादच्या अधिनस्त गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचा-यांच्या सहायक आयुक्त (चौकशी) यांचे कडील मोठया प्रमाणात प्रलंबीत विभागीय चौकशी प्रकरणांची संख्या विचारात घेता सदरील प्रकरणे मुदतीत निकाली काढण्याच्या दृष्टीकोनातून विभागीय चौकशीची प्रकरणे विशेष चौकशी अधिकारी यांच्या मार्फत चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाकडून जिल्हा परिषद,औरंगाबादकडे वर्ग करण्यात आलेली असून ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक डीईएन १०००/प्र.क्र.५८१/२०, मंत्रालय मुंबई-४०० ०३२, दिनांक १९ जानेवारी २००१ व ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन पूरक पत्र क्रमांक डीएनई १००३/ प्र.क्रं.४६२/ आस्था-२, मंत्रालय मुंबई-४०० ०३२ दिनांक १३ ऑक्टोंबर २००३ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार विभागीय चौकशी प्रकरणे निकाली काढण्याकरीता महाराष्ट्र राज्य सेवा वर्ग-१ मधील सेवा निवृत्त अधिका-यांची विशेष चौकशी अधिकारी यांचे जिल्हा परिषद,स्तरावर पॅनल तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

सबब,जिल्हा परिषद,औरंगाबाद कडील विभागीय चौकशी प्रकरणे निकाली काढण्याकरीता विशेष चौकशी अधिकारी यांचे पॅनल तयार करणे करीता अर्ज मागविण्यात येत आहेत.विशेष चौकशी अधिकारी नियुक्तीच्या सविस्तर जाहिराती करीता www.aurangabadzp.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

(नीलेश र.गटणे) भाप्रसे
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद औरंगाबाद
14.9.22



Scanned with CamScanner

## जिल्हा परिषद,औरंगाबाद विशेष चौकशी अधिकारी नियुक्ती करीता अटी व शर्ती

जिल्हा परिषद,औरंगाबादचे अधिनस्त गट-क आणि गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांविरुध्द सुरु करण्यात आलेल्या विभागीय चौकशीची प्रकरणे मोठया प्रमाणात प्रलंबित असल्यामुळे सदरील प्रकरणे मुदतीत निकाली काढण्याच्या दृष्टीकोणातुन जिल्हा परिषद स्तरावर विशेष चौकशी अधिकाऱ्यांचे पॅनल खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन गठीत करण्याचे प्रस्तावित आहे.

१. पॅनलवर नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त विशेष चौकशी अधिका-यांचे वय त्या वर्षाच्या दिनांक ०१ जुलै, २०२२ रोजी ७० वर्षापेक्षा जास्त नसावे.

२.विशेष चौकशी अधिकारी हा शारिरीक,मानसिक आरोग्याच्यादृष्टीने सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

३.विशेष चौकशी अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात किंवा सेवेत चौकशी अधिकारी गुंतलेला नसावा.

४.चौकशी अधिकाऱ्याने चौकशी प्रकरणासंदर्भात त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे /माहिती /आधार सामग्रीबाबत गोपनियता पाळावी आणि त्याचा वापर केवळ त्यांना सोपविण्यात आलेल्या प्रकरणाच्या चौकशीसाठीच करावा.चौकशी अधिकारी यांनी चौकशी कामकाज चालु असताना किंवा चौकशी अहवाल सादर केल्यानंतर अशी कोणतीही कागदपत्रे/माहिती किंवा आधार सामग्री उघड करता कामा नये.चौकशी अधिका-याने त्यांना सोपविलेल्या चौकशी प्रकरणाचा सर्व नोंदी /कागदपत्रे /कामकाज इ.बाबत गुप्तता व गोपनियता बाळगावी.चौकशी अधिकारी यांनी चौकशी अधिकारी म्हणून नेमणा-या नियुक्ती प्राधिका-याकडे सोपवावीत.

५.संबधित विभाग /कार्यालयाने त्यांच्या गट-क व गट-ड च्या एका अपचा-याच्या चौकशी प्रकरणी चौकशी अधिकारी यांना परिश्रमिकापोटी ५०००/- (रुपये पाच हजार फक्त) एवढी ठोक रक्कम मंजुर करावी.तसेच संबंधित विभाग/कार्यालयाने त्यांच्याकडील गट-क व गट-ड च्या एकापेक्षा अधिक अपचारी असणा-या चौकशी प्रकरणी चौकशी अधिकारी यांना पारिश्रमिकापोटी रु ८०००/- (रुपये आठ हजार रुपये फक्त) एवढी ठोक रक्कम मंजुर करण्यात येईल.

६.वरील पारिश्रमिकाव्यातिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक व लघुटंकलेखक यांच्या सेवेपोटी रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) एवढी अतिरिक्त ठोक रक्कम मंजुर करण्यात येईल.

७.चौकशीचे कामकाज विभागाच्या /कार्यालयाच्या मुख्यालयात किंवा प्रभारी अधिकाऱ्याच्या साक्षीदार असलेल्या ठिकाणीच पार पाडण्यात यावे. अपवादत्मक किंवा टाळता न येणाऱ्या परिस्थितीत चौकशी कामानिमित्याने चौकशी अधिकारी यांना प्रवास करावा लागल्यास सेवेत समकक्ष पदावर कार्यरत असणा-या अधिकाऱ्यांना देय असणाऱ्या दराप्रमाणेच चौकशी अधिकारी यांना प्रवासभत्ता /दौनिक भत्ता देय राहील.

८.नियुक्ती प्राधिकरणास कामाकाजाच्या कोणत्याही वेळी,कोणतेही कारण न देता आणि कोणतीही नोटीस न देता,चौकशी अधिकारी यांची सेवा समाप्त करता येईल.

९.चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या कालावधीत चौकशीचे कामकाज पुर्ण करुन त्यांनी चौकशी अहवाल संबंधित शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्यास सादर करणे अनिवार्य राहील.



Scanned with CamScanner

१०. विशेष चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक ही फक्त एक वर्षाच्या कालावधीसाठी राहील.त्यानंतर आवश्यकता वाटल्यास विभागीय आयुक्तांच्या संमतीने त्यांची आणखी एक वर्षासाठी फेरनियुक्ती करता येऊ शकेल.

११. विशेष चौकशी अधिकाऱ्यास एका वर्षात जास्तीत जास्त २५ विभागीय चौकशीची प्रकरणे निकाली काढावी लागतील.

१२.संबंधित विभागीय चौकशी अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारे महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागु होणार नाही.

१३.संबंधित विभागीय चौकशी अधिकाऱ्यांच्या नेमणूकीच्या आदेशात त्यांना नेमून दिलेले विभागीय चौकशीचे प्रकरण सहा महिन्याच्या आत निकाली काढण्यात यावे.विभागीय चौकशी सहा महिन्यात पुर्ण होऊ शकत नसेल तर योग्य समर्थन देऊन मुदतवाढ घेण्यात यावी.

१४.शिस्तभंगविषयक प्राधिकारणाच्या प्रभारी अधिकाऱ्याने त्यांच्याकडील विभागीय चौकशी प्रकरणी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. व अशाप्रकारे नियुक्त केलेले चौकशी अधिकारी एकपेक्षा अधिक असतील तर नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी अधिका-यांकडे विभागीय चौकशीची प्रकरणे देताना समान प्रमाण विभागून देण्यात येतील.

१५.विभागीय चौकशी करीता " केस टू केस " या तत्वावर एक चौकशी अधिकाऱ्याकडे कमाल ६ प्रकरणे सोपविण्यात येतील.

१६.चौकशी सोपविणाऱ्या विभाग/कार्यालयाने चौकशी अधिकारी यांना चौकशीच्या कामकाजासाठी आवश्यक फर्निचर व कुलुपे असलेली कपाटे तसेच स्टेशनरी /पोस्टेज तिकिटे पुरविण्यात येतील.

जिल्हा परिषद,औरंगाबादकडील गट-क आणि गट-ड च्या अपचारी कर्मचाऱ्यांच्या विभागीय चौकशी करीता विशेष चौकशी अधिकारी पॅनल करीता परिशिष्ट-अ मधील नमुन्यातील अर्ज दिनांक-26 सप्टेंबर, २०२२ रोजी सांय.०५.०० वाजेपर्यंत पोस्टाने अथवा समक्ष सादर करावा.

( नीलेश र. गटणे) भाप्रसे
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद औरंगाबाद
16.9.22



Scanned with CamScanner

परिशिष्ट-अ

औरंगाबाद जिल्हा परिषद अंतर्गत

विशेष चौकशी अधिकारी पॅनलवर नियुक्ती करीता करावयाच्या अर्जाचा नमुना

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव:आडनाव प्रथम | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | ई-मेल आयडी | |
| ५ | उमेदवार : महिला /पुरुष | |
| ६ | उमेदवाराची जन्मतारीख अंकामध्ये (शालांत परीक्षा प्रमाणपत्रानुसार) | |
| ७ | राष्ट्रीयत्व | |
| ८ | महाराष्ट्र राज्याचा मुळ रहिवाशी आहे काय? (होयं/नाही) | |
| ९ | अर्जदाराची शैक्षणिक अर्हता:- | |

| अ.क्र. | अर्हता | परिक्षा मंडळाचे/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | मिळालेले गुण | | प्राप्त गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकुण | प्राप्त | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| १० | सेवा निवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| ११ | अनुभवाचा तपशील थोडक्यात:- | |
| | गट-अ / गट-ब मध्ये सरळ सेवा / पदोन्नतीने दाखल झाल्याचे वर्ष | |
| | गट-अ / गट-ब मधील एकुण सेवा कालावधी | |
| १२ | विशेष चौकशी अधिकारी म्हणून यापुर्वी काम केल्याचा अनुभव आहे का ? असल्यास कालवधी आणि कार्यालयाचे नाव नमुद करावे. | |

ठिकाण:-

दिनांक:-

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी



Scanned with CamScanner